
ग्रं. सं. ठाणे
काव्य
२८९



REFBK-0022939
REFBK-0022939

# रुपेरी वाळूत माडांच्या बनात

शांताराम नांदगांवकर

(निवडक ध्वनिमुद्रित गीते)

काव्य
२४१९
२२९३९
संदर्भ शाखा
३/८/८०

# रुपेरी वाळूत माडांच्या बनात

निवडक ध्वनिमुद्रित भावगीते

कवि शांताराम नांदगांवकर

REFBK-0022939
REFBK-0022939

मूल्य दहा रुपये

प्रमुख विक्रेते : बॉम्बे बुक डेपो,
२६७, राजा राममोहन रॉय मार्ग,
गिरगांव, मुंबई ४०० ००४

प्रथमावृत्ती : १२ फेब्रुवारी १९८०

प्रकाशनाचे सर्व हक्क : सौ. वृंदा नांदगांवकर
' प्रशांत '
१९ ब, २० वा रस्ता
खार ( पश्चिम )
मुंबई–४०००५२

मुखपृष्ठ छायाचित्र : दत्ता बेर्डे

सजावट : इंडो ॲडव्हरटायझींग, मुंबई

प्रकाशक : कवे शांताराम नांदगांवकर सत्कार समिती, मुंबई.

मुद्रक : शरद कृष्णाजी सापळे
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
३१, त्रिभुवन रोड, मुंबई-४०००४.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९८
२२८३९
काव्य
शाखा (स्थल क्रम)

गुरुवर्य कै. ग. दि. माडगूळकर यांस

आदरपूर्वक अर्पण....

शांताराम नांदगांवकर



कवि शांताराम नांदगांवकर हे माझे परमस्नेही आहेत. ते आपल्या काव्य गुणामुळेंच लोकप्रिय झाले आहेत. त्यांच्या काव्या· तील भावगर्भ शब्द लालित्य वाखाणण्यासारखे आहे. व्यक्ती म्हणून त्यांचेसी बऱ्याच वेळा जवळीक साधली आहे. त्यांचा गोड सहवास कुणालाही हवाहवासा वाटेल. ते कुणाचाही द्वेष किंवा मत्सर करीत नाहीत. चांगल्याला चांगले म्हणणे हे सुद्धा तथाकथीत मोठ्या कलावंताला जमत नाही. पण जातिवंत कवि आपल्या फुलाने फुलतो. त्याचा सुगंध आसमंतास बराच वेळ दरवळत रहातो. ह्याची जाणीव त्याना आहे. त्यांच्याबद्दल जितकं लिहाव तितक थोडच आहे.

शांताराम नांदगांवकर हे चित्रपट सृष्टीतल्या व्ही. शांताराम प्रमाणे काव्यसृष्टीत चिरंतन चमकणाऱ्या ताऱ्याप्रमाणे चमकत रहातील अशी आशा मनापासून करीत आहे.

'अ' (१) लोकेश्वरी
नौपाडा, ठाणे

दि. १२-२-१९८०


## दोन शब्द....

येतो कधी कधी मी प्राजक्तसा फुलून
गंधाळतोहि नाही जाती फुले गळून

दातृत्व सोहळा हा आता कधी सरेना
स्वरसागरी बुडालो तरि षड्ज् सापडेना
माझ्यांच जीवनाचा मज अर्थ आकळेना

फुलासारखं फुलत रहावं, दुसऱ्यांना आनंद द्यावा, सुगंध द्यावा. परिसरात बोचणाऱ्या काट्यानी अंग रक्तबंबाळ झालं तरी डोळ्यात बिलोरी स्वप्न रंगवावीत असं काहीसं कवीचं जीवन असतं.

मी तरी त्याला अपवाद कसा असेन तरीही देत रहावं हीच भावना काळजाला भारून टाकीत असते. भावगीत लिहिताना दुसऱ्याचे मनोभाव आपलेच आहेत त्याचं सुख ते आपलंच दुःखहि आपलंच असं ज्या क्षणी होतं तेव्हा तेव्हा गीत लिहलं जातं. हे सुखदुःखांचे टिपलेले क्षण मी ग्रंथात गुंफले. कधी शब्दांच्या पलिकडल्या स्वरांच्या दुनियेत सुराच्या भावनांचा वेध घेत असतांनाच गीत निर्माण झालं; नि आपण त्याला दाद दिलीत हीच माझी कमाई. दुसरं काय.



'प्रशांत'
१९ ब, २० वा रस्ता
खार ( पश्चिम )
मुंबई ४०० ०५२
दि. १२-२-८०

# भावगीत मालिका

| गीत | गायक/गायिका | संगीतकार | प्रकाशक |
|---|---|---|---|
| १ रुपेरी वाळूत | आशा भोसले | अनिल अरुण | HMV |
| २ ही नव्हे चांदणी | सुमन कल्याणपूर | दशरथ पुजारी | HMV |
| ३ रात्र आहे पौर्णिमेची | सुमन कल्याणपूर | दशरथ पुजारी | HMV |
| ४ विसर प्रीत विसर गीत | सुधीर फडके | यशवंत देव | HMV |
| ५ रामप्रहरी रामगाथा | कृष्णा कल्ले | श्रीनिवास खळे | HMV |
| ६ मीरेचे कंकण | कृष्णा कल्ले | श्रीनिवास खळे | HMV |
| ७ असाच यावा पहाटवारा | अरुण दाते | अनिल मोहिले | HMV |
| ८ हा चेंडू दैवगतीचा | पद्माकर शिवलकर | गौतम गिरीश | INRECO |
| ९ मी नयन स्वप्नवेडा | दशरथ पुजारी | दशरथ पुजारी | HMV |
| १० लाजून हासता तू | जयवंत कुळकर्णी | दत्ता मोहिते | HMV |
| ११ या अबोल चांदण्यात | जयवंत कुळकर्णी | दत्ता मोहिते | HMV |
| १२ गे लाजवंती सांग ना | दशरथ पुजारी | दशरथ पुजारी | HMV |
| १३ वृंदावनात माझ्या | माणिक वर्मा | प्रभाकर जोग | HMV |
| १४ हरीनाम मुखी रंगते | आशा भोसले | अनिल अरुण | HMV |
| १५ सूर सनईत न दावला | उषा मंगेशकर | अनिल अरुण | HMV |
| १६ नकोस नयनी भरू आसवे | माणिक वर्मा | प्रभाकर जोग | HMV |
| १७ उगा पतंगा जळशी | अनुराधा पौडवाल | अशोक पत्की | INRECO |
| १८ सावळ्या हरीचे | माणिक वर्मा | अशोक पत्की | INRECO |
| १९ धुंदीत गंधीत होऊत सजणा | उषा मंगेशकर | अनिल अरुण | HMV |
| २० आलीस सांजवेळी | भूपेंद्रसिंग | अशोक पत्की | INRECO |
| २१ जनाई करिते हरिभजन | शकुंतला | अशोक पत्की | INRECO |
| २२ चल चल रे सजणा | राणी वर्मा | अशोक पत्की | INRECO |
| २३ गा रे प्रभुचे गाणे | भूपेंद्रसिंग | अशोक पत्की | INRECO |

| गीत | गायक/गायिका | संगीतकार | प्रकाशक |
|---|---|---|---|
| २४ ये अशी ये गडे | परेश पेवेकर | शांताराम नांदगांवकर | HMV |
| २५ गा गीत तू सतारी | राणी वर्मा | अशोक पत्की | INRECO |
| २६ हे जीवन म्हणजे क्रिकेट | सुनील गावस्कर | गौतम गिरीश | INRECO |
| २७ श्रीरंग सावळा तू | अरुण दाते-कृष्णा कल्ले | अनिल मोहिले | HMV |
| २८ धाव जोसात तुफान वारा | नूतन विनय मांडके | आत्माराम मोरजकर | INRECO |
| २९ उदासीन रानी | विजय मांडके | आत्माराम मोरजकर | INRECO |
| ३० कशासाठी वेड्या | पद्माकर शिवलकर | गौतम गिरीश | INRECO |
| ३१ रजनीगंधा | अनुराधा पौडवाल | अनिल अरुण | HMV |
| ३२ रात झाली अति | राणी वर्मा | अशोक पत्की | INRECO |
| ३३ दूर जाते ही वाट | वाणी जयराम | दशरथ पुजारी | HMV |
| ३४ दर्यावरी र | हेमंतकुमार | प्रदीप-विलास | HMV |
| ३५ धुंद ही पौर्णिमा | उदय उपाध्ये | अशोक पत्की | INRECO |
| ३६ बेधुंद या आसमंतात | उषा मंगेशकर | अनिल अरुण | HMV |
| ३७ हे सावळ्या घना | अनुराधा पौडवाल | अनिल अरुण | HMV |
| ३८ माऊलीच्या भेटीसाठी | अनुराधा पौडवाल | अनिल अरुण | HMV |
| ३९ हसलीस एकदा | भूपेंद्रसिंग | अशोक पत्की | INRECO |
| ४० तुझ्या नि माझ्या भेटीमधुनी | अनुराधा पौडवाल | अशोक पत्की | INRECO |
| ४१ सजल नयन | अजित कडकडे | अशोक पत्की | INRECO |
| ४२ गगनी तम हा मावळला | शरद जांभेकर | अनिल अरुण | INRECO |
| ४३ कुंजवनी वाजे ही धुंद बासरी | उषा मंगेशकर | दशरथ पुजारी | INRECO |
| ४४ सुकानु नाखवा कलतय् र | नूतन | आत्माराम मोरजकर | INRECO |
| ४५ प्रीतितल्या भावना | नूतन | आत्माराम मोरजकर | INRECO |

| गीत | गायक/गायिका | संगीतकार | प्रकाशक |
|---|---|---|---|
| ४६ मुरलीधर घनःश्याम | कुमुद भागवत | दशरथ पुजारी | HMV |
| ४७ मी अशी ही बांधलेली | अनुराधा पौडवाल | | INRECO |
| ४८ तुझ्या लोचनांची | वामन धाकडे | प्रभाकर धाकडे | INRECO |
| ४९ शांतिदूता | जयश्री वेलसरे | अशोक पत्की | INRECO |
| ५० मोटचं पानी काडलर | उषा मंगेशकर | अनिल अरुण | HMV |
| ५१ आलीस सांजवेळी | भूपेंद्रसिंग | अशोक पत्की | INRECO |
| ५२ सजल घन आले सये | उषा वर्तक | प्रदीप वर्तक | INRECO |
| ५३ अवचित सजणी | शकुंतला | अशोक पत्की | INRECO |
| ५४ जय जय गणराया | शरद जांभेकर | प्रभाकर पंडीत | INRECO |
| ५५ प्रभू मी तुझ्या करातिल वीणा | माणिक वर्मा | अशोक पत्की | INRECO |
| ५६ जीवनाच्या खिन्न वाटा दूर जाती | भूपेंद्रसिंग | अशोक पत्की | INRECO |


कवि : शांताराम नांदगांवकर यांची आगामी प्रकाशने

- " गम्मत झाली भारी "

खास मुलांसाठी हलक्या फुलक्या
गीतांची मेजवानी

- " बकुळीच्या तळी "

भावपूर्ण सुगंधित गीतांचा गुलाबी गुलदस्ता....


* 20, 49

## १. रुपेरी वाळूत....

रुपेरी वाळूत माडाच्या बनात ये ना
बनात ये ना, जवळ घे ना
चंदेरी चाहूल लावीत प्रीतीत ये ना
प्रीतीत ये ना, जवळ घे ना ॥

बेधुंद आज आसमंत सारा
कुंजात गात मंद धुंद वारा
दाटे उरी प्रिया तुझा इशारा
देहावरी फुले असा शहारा
तुझा इशारा . . . असा शहारा ॥१॥

लाजेत आज ही फुले नहाती
गाली अनार प्रीतगीत गाती
तू ये निशा अशी करी पुकारा
दे ये प्रिया मला तुझा निवारा
तुझा निवारा . . . तुझा निवारा ॥२॥

## २. ही नव्हे चांदणी....

ही नव्हे चांदणी ही तर मीरा गाते
हरिरूप गोजिरे पूर्व दिशेला फुलते ॥ धृ ॥

गगनांत रंगले सूर अेकतारीचे
रंगात जाहले दंग गीत मीरेचे
पक्षीही निघाले शब्द वेंचण्या त्याचे
हळू हळू नेत्रिंचे काजळ रजनी पुसते ॥१॥

ना भान कशाचे रमली ही भक्तींत
ती गीत गुंफिते भक्तीचे मुक्तीत
तल्लीन शाम मग होईल या भावांत
भजनांत भावना भूपाळीची खुलते ॥२॥

भुजळील कृष्ण हा विश्व आंज सोन्याचे
नयनात सांठवुनि घेइन कण तेजाचे
देहात माझिया रूप विश्वदीपाचे
ही भावनाच हृदयात तियेच्या वसते ॥३॥

## ३. रात्र आहे पौर्णिमेची....

रात्र आहे पौर्णिमेची तू जरा येऊन जा
जाणिवा थकल्या जिवांच्या अेकदा अैकून जा ॥ धृ ॥

निथळला तो भाव सारा वितळल्या चंद्रातुनी
मिसळल्या मृदु भावनाही झोपल्या पानांतुनी
जागती नेत्रातली ही पांखरे पाहून जा ॥१॥

पांखरे पाहूत जा जी वाढली पंखाविना
सूर कंठातील त्यांच्या जाहला आता जुना
त्या पुराण्या गीतिकेचा अर्थ तू अैकून जा ॥२॥

अर्थ तू अैकून जा फुलवील जो वैराणही
रंग तो पाहून जा तो तोषवी अंधासही
ओंजळीच्या पाकळयांचा स्पर्श तू देवून जा ॥३॥

## ४. विसर प्रीत विसर गीत....

विसर गीत, विसर प्रीत, विसर भेट आपुली
यापुढे न चांदरात यापुढे न सावली ॥ धृ० ॥

कंठ दाटतो असा शब्दही मुळी न फुटे
काळजात एक एक तंतुही तसाच तुटे
मीच मांडिल्या घरात शून्यता विसावली ॥१॥

शब्द तू दिलास एक राहिलो विसंबुनी
वंचिलेस गे अखेर तूच शपथ मोडुनी
तूं अुगाच स्वप्नवेल संशयात जाळिली ॥२॥

डोळियांत मी तुझ्या अखेर पाप जाहलो
झेलण्या अुरी कलंक अेकटाच राहिलो
विश्व मोकळे तुला मला चिताच लाभली ॥३॥

## ५. रामप्रहरी राम गाथा....

रामप्रहरी राम – गाथा रंगते ओठावरी ।। धृ ।।

या दिशांनी राघवाचे गीत हे साकारिले
पाखरांनी आवडीने सूर त्याचे प्राशिले
रामनामी फूल फुलते डोलती तरू–वल्लरी ।।१।।

अेक वचनी, अेक पत्नि, अेक बाणी जो सदा
जो प्रजेचे सौख्य पाही, दुःख साही सर्वदा
तोचि विष्णू, तोचि शिवही, तोचि अपुला श्रीहरी ।।२।।

आळवीता नांव ज्याचे विश्व सारे भारते
प्राण होतो फूल, मी त्या रामचरणी वाहते
पूजनी या जाणिते मी जीवनाची माधुरी ।।३।।

ठेविला मी राम हृदयीं, राम अधरी लोचनीं
राहतो श्रीराम कंठी, आणि या श्वासातुनी
जीव मी ओवाळिते त्या सांवळ्या मूर्तीवरी ।।४।।

* रुपेरी वाळूत माडांच्या बनात *

## ६. मीरेचे कंकण....

मीरेचे कंकण भक्तीचे दर्पण
स्मरे ते रंगून हरीनाम– ॥

शब्द शब्द वेची तिची एकतारी
स्वरात श्रीहरी भरलेला– ॥

पायींच्या पैंजणी बोलतो घुंगरू
कसे मी विस्मरू हरिरूप– ॥

नाद चिपळ्यांचा करितो भजन
भावे भारावून अंतरीच्या– ॥

तोल सावरीतो ताल मृदुंगाचा
भक्तीच्या रसाचा पीता प्याला– ॥

प्राणांची ज्योत ही लावुनी लोचनी
हरीच्या चिंतनी रमलेली– ॥

श्रीहरी तयांत झाला एकरूप
उजळला दीप अद्वैताचा– ॥

## ७. असाच यावा पहाटवारा....

असाच यावा पहाटवारा जसा वितळतो पावा
आरस्पानी सूर मुलायम असाच नियळत यावा ॥धृ०॥

अस्मानाला असा चढावा कैफ सात रंगाचा
मावळतीला चंद्र झुकावा जरा फिकट अंगाचा
हळव्या पानांतून मोहरत मोहक गंध फुलावा ॥१॥

भरून यावा कंठ खगांचा आणि फुटावे गाणे
व्हावी उन्मन कुणी कोकिळा त्यांच्या मधुर स्वराने
हुंकारातुन असा ओघळत शब्द प्रीतिचा यावा ॥२॥

प्रशांततेवर कुणी स्मिताची रेघ अशी रेखावी
मिठीतले क्षण दिठीत टिपण्या तू मजजवळ असावी
लाजलाजुनी असा फुलोरा वेलीवर लहरावा ॥३॥

झुळझुळणाऱ्या निर्झरिणींची चरणगती तू घ्यावी
मला पाहण्या तुझी लोचने अशीच झुरत असावी
तव अधरातील मकरंद माझ्या ओठावर उतरावा ॥४॥

## ८. हा चेंडू दैवगतीचा....

हा चेंडू दैवगतीचा फिरतसे असा उसळून
कोणाचे जीवन उधळी . . . दे कुणास यश उजळून

या कालगतीची किमया ना कुणी जाणली केव्हा
लाविती दोष जन सारे, बरळती हजारो जिव्हा
नशिबाच्या या खेळाला या पहा जरा जवळून ।।१।।

टाकिल्या सागरी नौका, लाटांची नौबत झडली
वादळे झेलण्यासाठी दंडांच्या केल्या ढाली
कोलंबस झाले कोणी, कुणि जलात जाय मिळून ।।२।।

हे असेच होणे आहे मग दुःख कशाला त्याचे
ओंजळीत ठेव जपून उरलेले क्षण सौख्याचे
त्यानेच जिण्याचे गाणे उमलेल सूर जुळवून ।।३।।

## ९. मी नयन रूपवेडा....

मीं नयनस्वप्न वेडा तू धार आसवांची
तुज ओढ तापण्याची हृदयास जाळण्याची ॥धृ०॥

मी भावगंध रेखा तुजला किती कथाव्या
ना बोलता कहाण्या तूजशी किती वदाव्या
नजरेत अक्षरांच्या पुष्पांजली वहाव्या
माधुर्य मागतो मी तुज आस संपण्याची ॥ १॥

शब्दातुनी तुझ्या गे सारा नकार गाजे
जगणेही भासते हे आता अयोग्य ओझे
वैराण भावनांचे आकाश आज माझे
पाऊलवाट तव ती शिशिरातल्या जिण्याची ॥२॥

तव कोवळ्या मनाला का अर्थ ना कळावा
अजुनी तुला कसा ना स्वर आर्त आकळावा
मी छेडीतो तराणा का सूरही ढळावा
वीणेस ओढ लागे का आज भैरवीची ॥३॥

* रुपेरी वाळूत माडांच्या बनात *

# १०. लाजून हासता तू....

लाजून हासता तू गाली खळी पडावी
तेथे उनाड वेडी कोणी कळी दडावी ॥

डोळ्यात आळवीता अधुरी गुलाब गाणी
लहरुन थरथरावे डोही प्रशांत पाणी
त्यातून मोरपंखी स्वप्ने फुलून यावी ॥१॥

वारा खट्याळ अडवी खग शाम कुंतलांचे
मनही अडून जाते घेऊन पंख त्यांचे
क्षण वेचिता सुखाचे अमलून प्रीत यावी ॥२॥

हासून बोलता तू प्राजक्त ओघळावा
पदरास तू कितीही जपले, तरी ढळावा
हुंकार दाटतांना ओठी फुले फुलावी ॥३॥

तव सर्व हालचाली स्वप्नातल्या असाव्या
नयनी सुखावलेल्या शत गीतिका झुलाव्या
माझीच प्रीतबाधा हृदयी तुझ्या जडावी ॥४॥

## ११. या अबोल चांदण्यात....

या अबोल चांदण्यात गीत अेक बोलते
स्वप्नप्रिया लोचनात प्रीतिदीप लाविते ॥धृ०॥

या प्रशांत सावल्यात चांदणी हसे कुणी
गोजिऱ्या कळीस जाय सांद्र अनिल स्पर्शूनी
कुठे निवांत वृक्षावर वल्लरी विसावते ॥१॥

पर्णांच्या पापण्यात रुप तुझे साठवुनी
अधरावर फुललेले शब्द तुझे आठवुनी
वनदेवी मोहुनिया बघ तुला न्याहाळते ॥२॥

गुंजनात भृंग शांत झोपले फुलावरी
जाईचा धुंद थवा डोलतो झुल्यापरी
विलोभनात प्रीत तुझी शांत संथ वाहते ॥

## १२. गे लाजवंती सांग ना....

गे लाजवंती सांग ना जाशी अशी का दूरुनी
माझ्या मनाचा दिलरुबा तोऱ्यात आणि छेडुनी ॥धृ.॥

डोळयातली जाळी तुझ्या घेती उराला ओढुनी
गालातला गुलकंदही बेधुंद प्याला वारूणी
तव बोलकी ती पैंजणे जाती तरारा टोचुनी ॥१॥

शृंगारही लहरी तुझा, तू शूभ्रकांती पौर्णिमा
बेहोष केसांची क्रिडा, तू पूर्ण गे हृदयंगमा
बुजऱ्या भुजांचा खेळ हा दावून घेशी ओढणी ॥२॥

गे थांब ना का वंचना वेडया जीवांची अशी
लावूनिया मासा गळाला सांग का तू ओढिशी
बेताल चालीला तुझ्या तू घाल थोडी बांधणी ॥३॥

## १३. मी प्रीतभाव भोळी....

वृंदावनात माझ्या ही तुळस डोलते
मी प्रीतभाव भोळी पतिदेव पूजिते ॥

घरकुल सानुलेसे या दोन जीवितांचे
येथे सुखात नांदे हे राज्य वैभवाचे
सखयास मी मनाचे हे फूल वाहते ॥१॥

रघुनंद शाम विष्णू त्यांच्यात मी पहाते
सानंद प्रीतीगंगा त्यांच्या हृदी वहाते
तृप्ती मनोरथांची त्यांच्यात राहते ॥५॥

गत जन्मीच्या तपाचे हे पुण्य ये फळाला
या एक भावडीला राजा गुणी मिळाला
दोघास ईश्वराशी मी सौख्य मागते ॥३॥

*** दुपेरी वाळूत माडांच्या बनात ***

## १४. हरी नाम मुखी रंगते....

हरी नाम मुखी रंगते । अेकतारी करी वाजते
विनविते, मी तुला, भाववेडी मीरा
गोड नामी तुझ्या दंगते ॥धृ.॥

घरट्यात माझिया । आनंदाचा ठेवा
तूच यदुनाथा । सदा असू द्यावा
इतुकेचि मागणे । तुझ्यापाशी मी मागते ॥१॥

काम क्रोध मत्सर । कधी ना पाहिले
लोभ मोह सारे । दूर मी सारिले
हरीच्याच चिंतनी । जीवनास मी वाहते ॥२॥

दिनरात लावू दे । भक्तिचाच दीप
तुझ्या सहवासी । सरो भवताप
मनाच्या या मंदिरी । तुझे रूप साठविते ॥३॥

## १५. सूर सनईत नादावला....

सूर सनईत नादावला
पूर नयनांत या दाटला
सांग विसरू कशी मी तुला ॥धृ०॥

सान होते कशी मूक वेडी कळी
अमृताने तुझ्या वाढले मी खुळी
रोमरोमी जयाच्या तुझ्या भावना
गंध विसरेल का गे फुला ॥१॥

पुण्यवंतापरी या घरी जन्मले
सात जन्मातले भाग्य जे लाभले
सात या पाउली विस्मरू मी कशी
मूर्त आई तुझी वत्सला ॥२॥

पूस डोळे नको हुंदके आंसवे
चालले गे जरी मी पतीच्या सवे
माउली तू मला साउली जीवनी
मी तुझी लाडकी प्रेमला ॥३॥

* रुपेरी वाळूत माडांच्या बनात *

## १६. नकोस नयनी भरू आसवे....

नकोस नयनी भरू आसवे देऊ नको हुंदके
लक्ष्मी तू या नव्या घराची झालिस ग लाडके

तुझ्या पाउली येइल आता
आनंदाची अमोल सरिता
घरकुल अमुचे प्रसन्नतेने
होइल ग बोलके – १

इथे अंगणी किती नाचतिल
तुझ्या स्मितासम सुमने चंचल
तुझ्याच वात्सल्यातुन येतील
या सदनी माणिके – २

नको बावरू मुली अशी तू
मनी न ठेवी कसला किंतू
तुझ्या गुणांची गंगा आम्हा
पाहू दे कौतुके – ३

* रुपेरी वाळूत माडांच्या बनात *

## १७. उगा पतंगा जळशी....

मी तर रमते प्रभुचरणांसी
होऊनि त्यांची दासी
तू उगा पतंगा जळसी ॥ धृ ॥

मला धुंदीचा गंध न कळतो
जीव प्रभूस्तव हा तळमळतो
तू तर वेडचा प्रीती भुकेला
मी परी पावन तुळशी ॥१॥

देवाचा मज प्रिय देव्हारा
या ज्योतीला तिथे निवारा
योगिनी मी चिंतनात रमते
स्वामीच्यांच पदासी ।

अेक कळे मज सदा जागणे
नाथांच्या कीर्तनात रमणे
माझी मिणमिण नकळत मिळते
त्यांच्या दिव्य प्रकाशी ॥३॥

थांबवि नाजूक पंख जाळणे
मजसाठी नव जीवास छळणे
पहा लोचने भिजती पांखरा
खुपते शल्य अुराशी ॥४॥

## १८. सावळ्या हरीचे घेई सदा नाम....

सावळ्या हरीचे घेइ सदा नाम
तेणे तुझे काम पूर्ण करी ॥ धृ ॥

प्रल्हादाची भक्ती पाहुनी जो धावे
केशवा त्या ध्यावे मन मंदिरी ॥

चोखोबाचा भाव मानी सदा चोखा
तोच हरी देखा बरोबरी ॥

मानव्याचा ज्याला नित्य लागे ध्यास
हरीही तयास हृदयी धरी ॥

## १९. धुंदीत गंधीत होऊन सजणा....

धुंदीत गंधीत होउनि सजणा
प्रीतीत रंगुनि जाऊया . . .
छेडीत ये प्रीत – संगीत सजणा
प्रीतीत रंगुनि जाऊया ॥

कुंजात या गंधलेली फुले
माळुनि जाई झुले
गंधात ही धुंद झाली चमेली गुलमोहराला भुले
तुझी सखी तुझ्यासवे ही ॥१॥

पानातुनी रेशमी चांदणे हे
मोहून येते करी
गाण्यातले सूर हे अमृताचे
दाटून आले उरी
अशी घडी युगायुगाची ! ॥ २ ॥

## २०. येऊ कशी प्रिया....

आलीस सांजवेळी, घेऊन स्वप्न माझे
तव अंतरी परंतु जाणीव मात्र लाजे ।।

किती लालबुंद होशी भित्रीच तू अखेर
ओठातुनी फुटेना जरि शब्द तो अधीर
डोळ्यात गंधवेडी मुग्धा तुझ्या विराजे ।।१।।

तळव्यावरी तुझ्या ग रंगेल धुंद मेंदी
माझ्याही या करांना लावी खुशाल नादी
हृदयी चितारलेले ते स्वप्न आज साजे ।।२।।

स्वप्नातल्या छटांना गिरवून सांज – तारा
लागे सुरात गाऊ फुलवुनिया पिसारा
तेजात नाहती त्या स्वर मी तुला दिले जे ।।३।।

## २१. जनाई करिते हरीभजन....

जनाई करिते हरि भजन
दळितसे देवकीनंदन ॥धृ०॥

दाणे पडती फिरते जाते
शुभ्र सुधेसम पीठ सांडते
जनी भाबडी मिटुनी नयने
पूजितसे मोहन –॥१॥

मंदिर झाले तिच्या घराचे
जिथे तिथे हरिनामच नाचे
त्या नामाचे अमृत पिउनी
जनी झाली पावन –॥२॥

भक्तीचा हा असा सोहळा
भान विसरला शाम सावळा
नकळत गेला कंठी जनीचा
मुक्तीहार घालुन –॥३॥

## २२. चल चल रे सजणा....

चल चल रे सजणा गाऊ या
प्रीती फुलांनी न्हाऊ या
येथे कुणी ना अशा सांजवेळी
वारा हळू हा साद घाली ॥धृ॥

वेलीवरी ऐसा आता
साज नवा आला नाथा
पानोपानी प्रेमगाणी वेंचू या
चल चल रे सजणा गाऊ या ॥१॥

लोचनांची वेडी भाषा
प्रीतीच्या युगाची आशा
रानीवनी मोहरूनी जाऊ या
चल चल रे सजणा गाऊ या ॥२

## २३. गा रे प्रभुचे गाणे....

अश्व नसे गज नसे पालखी
तेथे पायी जाणे
भलेपणाला सोडू नको तू
गा रे प्रभुचे गाणे ॥धृ॥

येताना आलास मोकळा
बंद मुठी, जणु गोजिरा कळा
प्रकाश वारा वस्त्र तुझे अन्
ओठी होते रडणे ॥१॥

इथे धरेवर राहुनि वेड्या
उभारिल्या गर्वाच्या माड्या
माझे माझे म्हणुनि जमविले
ओझे केविलवाणें ॥२॥

जा आता तू असा एकला
आलेल्या शोधीत पाउला
मुठी मोकळ्या, नाही कटीला
फडके जुने पुराणे ॥३॥

* रुपेरी वाळूत माडांच्या बनात *

## २४. ये अशी ये गडे....

ये अशी ये गडे लाडके प्रेमले
धुंद आकाश हे आज आसावले ।।धृ०।।

आज स्वप्नांतले गीत हे बोलते
सोनपुष्पे अधाशी धरा वेचिते
पश्चिमा लाजली रंग गालीं फुले ।।१।।

मोतियांच्या मिनारी कुणी पक्षिणी
सांजवेड्या खगांना सवे घेऊनी
शोधिती शब्द का मेघदूतातले ।।२।।

शांत सारे इथे पान आहे मुके
भारला जीव हा शोधि वाटा, चुके
मोरपंखी तुरा आठवांचा झुले ।।३।।

मीलनाची घडी ये निशेच्या सवे
या क्षणाला तुझे गीत ओठी हवे
आपुल्या अंतरी एकतेची फुले ।।४।।

## २५. गा गीत तू सतारी....

गा गीत तू सतारी, गा गीत आसवांचे
या जीवनांत वेडे, नाही कुणी कुणाचे ॥धृ॥

किती रंग गंध हळवे, फुलती भल्या पहाटे
होता दुपार विरती, निमिषात सांज दाटे
काळोख पीत येती स्वर मंद काजव्याचे
गा गीत तू सतारी.... ॥१॥

पंखात ऊब घेते पिल्लू मुक्या खगाचे
चोचीत गोड दाणा घेण्यास जीव नाचे
पिल्लास पंख फुटता घर शून्य पाखराचे
गा गीत तू सतारी.... ॥२॥

धाग्यापरी सुईच्या स्वर आर्त छेद सारे
ते सांधती मनाचे आभाळ फाटणारे
गाण्यापरी जिण्याला आकार भावनांचे
गा गीत तू सतारी.... ॥३॥

## २६. हे जीवन म्हणजे क्रिकेट....

या दुनियेमध्ये थांबायाला वेळ कुणाला
हे जीवन म्हणजे क्रिकेट राजा हुकला तो संपला !!
अफाट अैशा मैदानी तू येशी वेळोवेळी
डाव तुझा येताच जमविशी जपून अपुली खेळी
काळ करी बघ गोलदांजी "संकट चेंडू" फेकी
भवताली तव झेल घ्यावया जो तो फासे टाकी
मागे टपला यष्टीरक्षक तुझा उधळण्या डाव
या साऱ्यांना चकवशील तर मिळेल तुजला धाव
चतुर आणखी सावध जो जो तोच इथे रंगला
हे जीवन म्हणजे क्रिकेट राजा हुकला तो संपला !!
हिरवळीवर खेळतांना सभोवर पहावे
तो दिसतात बहरलेली माणसांची अजब जंगले
ऊंच झाडे...खुजी झाडे...वाकडी झाडे... सरळ झाडे
यशाच्या झंबराखाली डोलणारी... नाचणारी...!!
अपयशाच्या अेका फटक्यात त्यांची पाने गळून जातात
जयघोषाच्या जल्लोशातली हवाच सारी निघून जाते
शेंड्यावरती, खांद्यावरती नाचवणारे
क्षणात आपल्या पारावरही थोडी जागा देत नाहीत
जसा येथल्या दरबारातील न्याय सदा आंधळा
हे जीवन म्हणजे "क्रिकेट" राजा हुकला तो संपला
तू अैकत असता जयघोषाचे नारे
या कालगतीचे नकोस विसरु वारे
फट्कार अचुक तू चेंडू या काळाचा
आयुष्य असे रे... डोंगर जणु धावांचा
निरंत राहिल तुझी आठवण इथल्या कणाकणांना
हे जीवन म्हणजे "क्रिकेट" राजा हुकला तो संपला

* रूपेरी वाळूत माडांच्या बनात

## २७. श्रीरंग सावळा तूं....

ती – श्रीरंग सावळा तू मी गौरकाय राधा
ही प्रीत दो जिवांची अद्वैत रे मुकुंदा !!

तो – ये राधिके अशी ये होऊनि प्रीतिमुग्धा
नयनांतुनी फुलू दे अपुल्या अमोल छंदा !!

ये प्रेमले अशी ये फुलवीत सुप्रभाती
प्रणयातल्या सुरांनी सजवीत सांजराती
मिटल्या फुलापरी त्या तव नील लोचनांत
लावून भारलेली भावूक प्रीतिज्योत ॥१॥

ती – श्रीरंग सावळा तू .....
का लोचनी प्रिया रे हृदयी तुझेच रूप
दिनरात लाविते मी येथे तुझाच दीप
गाते तुझेच गाणे, स्वप्नी तुझे उखाणे
तुझियाकडेच धावे मनपाखरू दिवाणे ॥२॥

तो – ये राधिके अशी ये
येताच मी परंतु तुझिया समीप का गे
होशी अबोल वेडी विणिशी मनांत धागे
त्या चित्तपाखराला लपवून ठेविशी का ?
भारावूनी अशी या नेत्रात पाहशी का ? ॥३॥

ती – श्रीरंग सावळा तू....
ते बोलके अबोल क्षण सर्व आठवावे
मम लाजऱ्या दिठीत सारेच साठवावे
हा छंद या जिवाला जडवी तुझीच मूर्ति
मी मंगलातुनी ही गुंफी अभंग नाती

श्रीरंग सावळा तू... ॥४॥
ये राधिके अशी ये..

## २८. धाव जोसात तुफान वारा....

तो – धाव जोसात तुफान वारा
आल्या शिराशी बेभान धारा ॥
ती – मार जीवाला जपून वल्हा र नाखवा
अंगाशी दिसं किनारा रं ॥

तो – होरी भरून मासोली धरली
माज्या मनानं तुला वी हेरली
अशा लाटा पेलुन तुला नेईन झेलुन
माजा दर्याला दाविन दरारा ग ॥१॥

ती – तू रं दिलाचा तांडेल सजना
गोमू तुजी मी पिर्तीची मैना
तुज्या होरीवरुन जिनं जाईल तरून
तुज्या कालजात माजा निवारा रं ॥२॥

## २९. उदासीन रानी....

उदासीन रानी उदासीन गाणी
मुके आज डोळे मुके त्यात पाणी
मुकी प्रीतवाणी तुझ्यावीन राणी ॥

इथे चंद्र तारे तरूंचे फुलोरे
फुलांच्या व्यथांचे पिसारेच सारे
उसासेच टाकी इथे रातराणी
उदासीन रानी उदासीन गाणी ॥१॥

किती आठवू मी तुझ्या हालचाली
सुगंधातल्या त्या स्मितांच्या पखाली
सुखें दूर गेली तुझ्या पावलांनी
उदासीन रानी उदासीन गाणी ॥२॥

## ३०. कशासाठी वेड्या....

कशासाठी वेड्या तुज काळजी उद्याची
काळ चालला रे त्या तमा ना कुणाची ॥

ध्येय मंदिराची तू वाट शोधिताना
चांदण्यांत फिरशी तमात चालताना
आंधळ्या नभी या तू थकून पाहताना
वाट दाखवीत असे चांदणी ध्रुवाची ॥१॥

रान पाखरांना कोण दे निवारा
पान फूल भिजते घनात संथ धारा
कालचक्र ऐसे हे चुकून थांबते ना
नित्य ठेव जाण मनी विश्वचालकाची ॥२॥

दु:ख धावते रे शोधण्या सुखाला
लपंडाव जगती असाच चाललेला
सौख्य झुंबराला, खांद्यास दु:ख डोला
पालखी अशीच खुळ्या चालते जिण्याची ॥३॥

※ रूपेरी वाळूत माडांच्या बनात

## ३१. रजनीगंधा....

रजनीगंधा जीवनी या बहरूनी आली
मनमीत आला तिच्या पाऊली ॥

फुलल्या मनाच्या मुक्या पाकळ्या
झुलल्या लता आज प्रीतीतल्या
अशी आली प्रीती ल्याली
नवी ही कळी . . . ॥१॥

रजनी अशी ही निळी सावळी
किरणात न्हाली धरा मलमली
अशा वेळी प्रिया येई
फुले लाजली . . . ॥२॥

## ३२. रात झाली अती....

रात झाली अती वाट पाहू किती
या मनाला सख्या आवरू मी किती
ज्वानीचा घोडा राया चौखूर सुटला ॥ धृ ॥

नको नको किती म्हणू तरी तोल सुटावा
अस धावं येड्यावानी
हळू हळू, नको छळू, किती धीर धरावा
बाइ डोळा आणुन पाणी
चोळी दाटे ऊरी इष्क मारी सुरी
हौस माझी सख्या तूच कर ये पुरी
ज्वानीचा घोडा राया चौखूर सुटला ॥१॥

माझ मन खोलू कशी
कुणा गूज बोलू कशी
तुझ्यासाठी झुरे अशी
प्रीत माझी वेडीपिशी
माझ्या प्रीतीची आन तुझा काढीन पता
तुला भेटेन तवा बर वाटल चिता
ज्वानीचा घोडा राया चौखूर सुटला ॥२॥

## ३३. दूर जाते ही वाट....

दूर जाते ही वाट रात अंधारी दाट
अरे कान्हा रे मला जाऊ दे घरी ॥धृ॥

आज जाई जुई साद देती मला
आज काळोख सारा कृष्ण हा कृष्ण झाला
धीर कैसा धरू मन कसे आवरू
अरे कान्हा रे मला जाऊ दे घरी ॥१॥

सांजवेळी कसा आज तू येऊनी
राधिकेला अशी अेकटी पाहुनी
हाय धरीशी करा लाज तुज ना जरा
अरे कान्हा रे मला जाऊदे घरी ॥२॥

राधिकेचा हरी प्राण हा जाहला
तेज ज्योतीस आले प्रीतिचा सोहळा हा
कृष्ण माझा जरी रात वैरी तरी
अरे कान्हा रे मला जाऊ दे घरी ॥३॥

## ३४. दर्यावरी र....

ती– दर्यावरी र.... तर्ली होरी र
तुजी माजी जोरी बरी साजना
तो– होरीतुनी जाऊ घरी साजनी
ती– होरीतुनी जाऊ घरी साजना
होरीतुनी जाऊ घरी र .... ॥धृ०॥

तो– मासोलीच डोल तुज !
ती– जाल्यावानी मन तुज र
तो– गावल परडी भरली
गोमूच्या (ग) पिर्तिच्या या मासोलीन
ती– साजना नको आता जाऊ दुरी
तो– साजनी होरीतुनी जाऊ घरी र .... ॥१॥

तो– शिरातुनी आयला वारा
होरीला गो नाही थारा
ती– नाखवा घोर नको कालजाला
कोलीवारा आंगाशी आता आयला
तो– साजनी होरीतुनी जाऊ घरी
ती– साजना होरीतुनी जाऊ घरी र .... ॥२॥

## ३५. धुंद ही पौर्णिमा....

धुंद ही पौर्णिमा धुंद वेली अशा
धुंद या मीलनी धुंद दाही दिशा ॥ध्॥

पानात कुठे मधु गीळ अुठे
गीतात सुंद मृदु भाव फुटे
गालात तुझ्या डाळिंब फुले
डोळ्यात रंगते धुंद नशा ॥१॥

बेधुंद पिसे दो जीव असे
हृदयात कुसुंबी प्रीत वसे
त्या मौन कळ्या फुलता सगळ्या
गंधात मिसळते धुंद निशा ॥२॥

चल ये जवळी हे स्वप्न नसे
जन्मात कधी क्षण येती असे
ये प्रीत फुला दे गीत मला
होईल निशांती धुंद अुषा ॥३॥

## ३६. बेधुंद या आसमंतात....

बेधुंद या आसमंतात झाले
बेधुंद सारे तराणे
सजणा तुझ्यासवे !
ही रात, प्रीत मोहरुन गीत ये नवे !!

बेहोष वारा असा हा
गंधीत झाल्या दिशा
किती आठवणी मनी साठवूनी
आली शृंगारवेडी निशा ही
या अंबरात तेज न्हात तेवती दिवे ॥१॥

लाटावरी चांदण्यांचा
दाटून आला थवा
झुले पाण्यावरी फुलवेडी परी
प्रीतरंगात ही रंगलेली
पानात वाट शोधितात धुंद काजवे ॥२॥

## ३७. हे सावळ्या घना....

हे सावळ्या घना का छेडिसी मनाच्या अशा
तारा पुन्हा पुन्हा ॥धृ०॥

पानातुनी या मोहुनी गाणे जलाचे फुले
गाण्यातुनी त्या दाटुनी झेले फुलांचे हासले
वारा हळू हा प्रीती स्वरांनी
झुलवी तृणा तृणा
हे सावळ्या घना ॥१॥

थेंबा परी या नाचवी पक्षी स्मृतींचा तुरा
त्या आठवानी भारले माझ्या मनाच्या अंबरा
आता प्रियाची चाहूल ऐसी
भुलवी कणा कणा
हे सावळ्या घना ॥२॥

## ३८. माऊलीच्या भेटीसाठी....

माउलीच्या भेटीसाठी आतुरला जीव
विठू तुझ्या राउळाची वाट मला दाव ॥धृ०॥

दाणे दळीता कांडीता घेई तुझे नाम
पाणीयासी जाता पाही तुझा वर्ण शाम
प्रभु तुझ्या राउळाची वाट मला दाव
रानीवनी दाटे देवा तुझे गोड नांव ॥१॥

पाडसाचे हंबरणे नाही ऐकिसी का
माये लेकरा टाकून दूर राहसी का
श्वास दाटूनिया आला बावरला जीव
प्रभु तुझ्या राउळाची वाट मला दाव ॥२॥

## ३९. हसलीस एकदा....

हसलीस एकदा निजल्या शरद राती
बहरली फुलांनी निशीगंधाची नाती ॥धृ॥

लेवून शुभ्रतर किरणांचे फुलपंख
चरणातून पेरीत प्रीत पैंजणे लाख
अुधळीत अशी तूं आलीस भावूक स्वाती ॥१॥

तू हसुनि बोललीस होऊनी लज्जित थोडी
अुलगडली नयनी तुझ्या गुलाबी कोडी
नजरेतून झरल्या प्रणयधुंद बरसाती ॥२॥

हे युगायुगांचे प्रीतीचे अनुबंध
तेजातुन उजळित हृदयातील आनंद
येईल निशेच्या दारी सौख्य प्रभाती ॥३॥

## ४०. तुझ्या नि माझ्या भेटी मधुनी....

अनुरागाचे थेंब झेलती प्रीत–लतेची पाने
तुझ्या नी माझ्या भेटी मधुनी फुलती धुंद तराणे ॥धृ॥

मंतरला हा कुंज लाजरा
मह्रिवरला सुमभार हासरा
झिरमिर–झिरमिर पाऊस धारा गाती श्रावण गाणे ॥१॥

मधुमय हा मृदगंध वाहतो
बहरुनिया वनवृंद नाचतो
तरुवेलींना असे बिलगती
अधिऱ्या प्रीत सुखाने ॥२॥

रुपेरी वाळूत माडांच्या बनात *

## ४१. सजल नयन....

सजल नयन नित धार बरसती
भावगंध त्या जली मिसळती ।।

वीणेचे स्वर अबोल झाले
गीतामधले काव्यही सरले
मुक्या मनाचे मुकेच आठव
मूक दीपज्योतीसम जळती ।।१।।

चंद्र चांदणे सरले आता
निरस जाहली जीवन गाथा
त्या भेटीतील अमृत धारा
तुझ्याविना विषधारा होती ।।२।।

थकले पैंजण चरणहि थकले
वृंदावनीचे मोहन सरले
तुझ्या स्मृतीची फुले प्रेमले
अजुनी उखाणे मला घालीती ।।३।।

* दुपेरी वाळूत माडांच्या बनात *

## ४२. गगनी तम हा मावळला....

गगनी तम हा मावळला
अरुण क्षितिजी उगवला
तिमिर सरला.. ॥

फुलल्या तरूलता
दिव्यत्वाची सजीव चारूता
अवनीवरती खुलुनी आली
मोद भरला.. ॥१॥

हसल्या दशदिशा
तेजामधुनी मुदित ही उषा
उभी लाजुनी प्राचीवरती
प्रणय सजला.. ॥२॥

## ४३. कुंजवनी वाजे ही....

कुंजवनी वाजे ही धुंद बांसरी
गौळणींनो आला ग आला हरी

यमुनेच्या पाण्याला पूर येइ गाण्याला
पैंजणात जीव गुंतला ग
रास अशी रंगुनिया गेली पुरी
गौळणींनो आला ग आला हरी

पाय पडे तालात, ताल जमे बोलात
बोल घुमे गाण्यातुनी हो
शाम असा गोपींना गुंगवी स्वरी
गौळणींनो आला ग आला हरी

टिपऱ्यांच्या नादाला आसमंत भुललेला
नर्तनात कृष्ण रंगला ग
गोपसखा विश्व असे वेडे करी
गौळणींनो आला ग आला हरी

## ४४. सुकानू नाखवा....

सुकानू नाखवा कलतय र
तुफान झेलीत चालिव र
होरी चालिव र ॥ धृ ॥

लाटांनी झोरलं, वाऱ्यानं घेरलं
आबाल भरलं र
कालीज माजं भीतीन नाखवा
किती थरारलं र
तुज्याच संगती चालतेय् र
मनांतल भय माज्या घालिव र
राया घालिव र
जिवाच्या माज्या तांडेला ॥१॥

सोन्याचं म्हावरं जाल्यात गावलं
दर्यानं जानलं र
म्हनूनि कावला, माराया धावला
वादल आनलं र
कोल्याची छाती दांडगी र
समिंदराला या दाखिव र
जिवाच्या माज्या तांडेला ॥२॥

## ४५. प्रीतीतल्या भावना....

प्रीतीतल्या भावना वेचीत ये साजणा
रात मधुर ही त्यात अधिर मी
आतुर मनी या प्रीतीतल्या भावना ॥धृ॥

कुजातला गारवा अता वाटतो मज हवा
हातात दे ये हात तुझा
जाणी माझ्या मना ॥१॥

हा भारला चांदवा पुन्हा भासतो बघ नवा
चंद्राळले मी राणी तुझी
वेडी तुझ्याविना ॥२॥

## ४६. मुरलीधर घनःश्याम सुलोचन....

मुरलीधर घनःश्याम सुलोचन
मी मीरा तू माझे जीवन

तुझ्या मूर्तिविन या डोळ्याना
कृष्ण सख्या रे काही कळेना
अेक तारीच्या सुरात माझ्या
तुझेच अवघे भरले चिंतन ॥१॥

शामल तनुचा तव देव्हारा
जीव ज्योतिला माझ्या थारा
चिंतनात मी रमते तुझिया
सोबत करताळांची किणकिण ॥२॥

विषासही तू अमृत केले
या वेडीला जीवन दिधले
हे अुरलेले जीवित माझे
तुला मुकुंदा करिते अर्पण ॥३॥

* रुपेरी वाळूत माडांच्या बनात *....

## ४७. मी अशी ही बांधलेली....

मी अशी ही बांधलेली मी कशी स्वप्नात येऊ ?
या तुझ्या गीतास वेड्या मी कशी स्वरसाज देऊ ?

मी मनाच्या पावलांनी चालले . . . कळलेहि नाही ।।
सागराच्या या तळाशी धावले . . . वळलेहि नाही ।।
या उदासी घोर लाटांचे कसे मी दुःख साहू
मी अशी ही बांधलेली . . . मी कशी स्वप्नात येऊ ।।१।।

मी रुंदींच्या शृंखलांनी पाय हे बांधून घेते
अन् स्वरांच्या कंपनाना काळजीची साथ देते
काजळी रात्रीत कुठवर लोचनांचे दीप लावू
मी अशी ही बांधलेली . . . मी कशी स्वप्नात येऊ ।।२।।

लाखदा समजाविते परि राहतो ना जीव आता
मी किती स्वप्नाळते पण उघडती ना पंख नाथा
आठवांचा चांदवा पदरी कसा लपवून ठेवू
मी अशी ही बांधलेली . . . मी कशी स्वप्नात येऊ ।।३।।

हे असे भिजतात डोळे तू नको स्वप्नात येऊ
मदिर हळवी गीत सुमने माझिया केसात खोवू
त्या सुखाने भारलेला गंध कैसा सांग लेवू
मी अशी ही बांधलेली . . . मी कशी स्वप्नान येऊ ।।४।।

## ४८. तुझ्या लोचनांची मला दृष्टी यावी....

तुझ्या लोचनांची मला दृष्टी यावी
दया धर्मं मानव्याची तृषा ना शमावी ॥ धृ ॥

बोधिसत्व सिद्धार्था रे सत्वशील व्हावे
मानवास अुद्धाराचे द्वार दाखवावे
सुगंधास बंधुत्वाच्या पालवी फुटावी
दिशातून चैतन्याची गीतिका फुलावी ॥१॥

कुठे कोण विश्वामाजी व्यथेने विझाला
प्रेमदीप हृदयी त्यांच्या तूज तेववीला
...दीन दुःखितांची दुःखे तूच संपवावी
आसवात भिजली त्यांची कथा तू पुसावी ॥२॥

नव्यानेच बुद्धत्वाला मनी वाढवीले
काम क्रोध दंभाला मी दूर लोटियेले
तुझ्या चिंतनाने सारी सृष्टि पुण्य व्हावी
"बुद्ध – धम्म – संघाला" ही अता शरण यावी ॥३॥

## ४९. शांतिदूता...

सत्य दयेच्या मार्गाने
कालचक्र चालावे ... शांतिदूता ... शांतिदूता ॥धृ॥

माणसारा या द्वेषाने हीन दीन रे केले
अतिलोभाच्या तृष्णेने विश्व लयाला गेले
दिव्य तुझ्या सामर्थ्याचे दान आम्हाला द्यावे ...
शांतिदूता शांतिदूता ... ॥१॥

सत्य धर्म बंधुत्वाला गोल या जगी गावे
परपीडेच्या दुःखाला आत्महृदी कवळावे
अंध अघोरी स्वार्थाला परमार्थे दिपवावे
शांतिदूता शांतिदूता ... ॥२॥

पुण्यशील मानव्याला पुण्य रूप रे यावे
पंचशील –पुण्याईचे तीर्थ जगाने प्यावे
अेक नव्या आनंदाचें तेज जगाला द्यावे
शांतिदूता शांतिदूता ... ॥३॥

## ५०. मोटंचं पानी काडलं र....

मोटंचं पानी काडलं र
शेताला प्यायाला घातलं र
आता मोत्याची रास र
घरला येइल माज्या
ढवळ्या र पवळ्या र ॥धृ॥

उभं शिवार सोन्यानं मोत्यानं
अफाट भरलंय र
वर आबाळ खुशीनं मोदानं
हे मोहरलंय र
दिन सुगीच सार येतील म्होरं
जिवाच्या सरजा र
ढवळ्या र पवळ्या र ॥१॥

कसं वाऱ्यानं कणीस झोकात
तोऱ्यात डुलतंय र
माझ्या मनाचं पाखरु खुषीनं
हे भिरभिरतंय र
दिस सोन्याचं आता तुजं नि माजं
सुखानं आलं र
ढवळ्या र पवळ्या र ॥२॥

## ५१. आलीस सांजवेळीं....

आलीस सांजवेळीं घेऊन स्वप्न माझे
तव अंतरी परंतु जाणीव मात्र लाजे ।।धृ।।

किती लालबुंद होशी भित्रीच तू अखेर
ओठातुनी फुटेना जरि शब्द तो अधिर
डोळ्यात गंधवेळी मुग्धा तुझ्या विराजे ।।१।।

तळव्या वरी तुझ्या ग रंगेल धुंद मेंदी
माझ्या ही या करांना लावी खुशाल नादी
हृदयी चितारलेले ते चित्र आज साजे ।।२।।

स्वप्नातल्या छटांना गिरवून सांज-तारा
लागे सुरात गाऊ फुलवूनिया पिसारा
तेजात नाहती त्या स्वर मी तुला दिले जे ।।३।।

## ५२. सजल घन आले सये....

सजल घन आले सये, भिजली वनराणी अशी
पैलतिरी माझ्या प्रीया एकली जाउ कशी ।।धृ।।

ही धुंदावलेली नदी ग झाली वेडीपिशी
बेभान जल धारा कोसळोनी धावती बाई दाही दिशी
नाही किनारा कुठे बेबंद वारा सुटे
आभाळ ऐसे फुटे सजण झणी पाहु कशी ।।१।।

या पानातुनीहि पाखरू नाही कोणी दिसे
हलती तरुवेली कापती ग जडले जणु कोणी पिसे
भेटू प्रियाला कशी, ही रात्र वैरी जशी
मी चिंब झाले अशी विरह मनी साहू कशी ।।२।।

## ५३. अवचित सजणी....

अवचित सजणी – जडली प्रीती
   मोहवी माझ्या मनाला
साजण आला – स्पर्शुन गेला
   गूज हे सांगू कुणाला ।।धृ।।

फूल धुंद कुंज मंद गंध वाहतो
   वारा सुखाच्या जली नाहतो ।
हा मिलिंद प्रीती छंद स्वैर पेरितो
   माझ्या मनाचा सखा भासतो
रात आज मोहरून आली भराला ।।१।।

बावरून – सावरून – जीव लाजतो
   देही शहारा असा दाटतो ।
या सुखात आसमंत स्वर्ग वाटतो
   भाषा जिण्याची मला सांगतो ।।
मी मिठीत साठवून माझ्या प्रियाला ।।२।।

## ५८. जय जय गणराया....

जय जय गणराया गौरीच्या तनया
भक्ताच्या हाकेला धावून या ॥ धृ ॥

सुखकर्ता दुःखहर्ता कीर्ती तुमची गाजे
करुणाकरा मजसी ताराया या . . . ॥

ओम्कारा गणत्राता दीनांच्या नाथा
सुमदुर्वा – पूजा ही स्वीकारा या
या गौरीकुमरा या विघ्नहरा
कर्पुरगौरा तुमच्या जपतो मी नामा
सिंदुरवदना मंगल कार्याला या . . . ॥१॥

त्रैलोकी तू गणेश देवांचा त्राता
संकट अमुचे बाप्पा हरण्याला या
या गौरीकुमरा या विघ्नहरा
चिंतामणि तुमच्याविन व्याकुळले प्राण
सकलांना संरक्षण देण्यासी या . . . ॥२॥

## ५५. प्रभू मी तुझ्या करातिल वीणा....

प्रभू मी तुझ्या करातिल वीणा
आनंदाचे छेड सूर वा
अश्रू जलाची करुणा ॥

सात स्वरांच्या जोडुनि तारा
तूच घडविले या आकारा
तुझ्याच केवळ करस्पर्शाने
फुलवी तूच तराणा ॥१॥

तुझ्या मनातील दिव्य सुरावट
कुणि न जाणितो नशिबाचा पट
तव चरणाशी लीन होतसे
रंक असो वा राणा ॥२॥

घे मजलाही तुझ्या पदांसी
जन्म घालविन होऊनि दासी
तुझ्याच भजनी समरसताना
मुक्ति मिळो या प्राणा ॥३॥

REFBK-0022939

## ५६. जीवनाच्या खिन्न वाटा....

जीवनाच्या खिन्न वाटा दूर जाती
प्राणवाती थकून आता मंद होती ॥ ध्रू ॥

साहताना कितीदा पहारा
   यानिला आसवांचा सहारा
पापण्या या कुणासाठी गीत गाती ॥१॥

मी लतेला हळू स्पर्श केला
   जाग त्याची न आली कळीला
पाकळ्या या कुणासाठी धुंद होती ॥२॥

सोबती ना कुणी सांजवेळी
   वाट अंधारली का अवेळी
वाळवंटी पायवाटा अंध होती ॥३॥